ePaper
दिल्लीचे पडसाद मुंबईत; भाजपच्या आंदोलनाला हिंसक वळण
॥ वर्ष - 8 । अंक -161 ॥ UDYAM-MH-26-0158827 ॥

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com ॥ शुक्रवार, दिनांक 20 डिसेंबर 2024 ॥ पुणे आवृत्ती ॥ mahaenews.com ॥ maha_enews ॥ Mahaenews






देवाभाऊ, तुस्सी ग्रेट हो !
विशेष संपादकीय
पान 4 वर

## विशेष संपादकीय



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक

## देवाभाऊ, तुस्सी ग्रेट हो !

शिल्लक शिवसेना म्हणजेच उबाठा गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणे, साहजिकच सर्वांसाठी चर्चेचा विषय आहे ! कारण, गेली पाच वर्षे उद्धव ठाकरे यांनी देवेंद्रजी म्हणजे देवाभाऊंबाबत बोलताना एकही शिवी शिल्लक ठेवली नसेल. त्यांची प्रत्येक पत्रकार परिषद किंवा जाहीर सभा ही देवाभाऊंवर शिव्यांची लाखोली वाहण्यासाठीच होती की काय ? असा बहुतेकांना प्रश्न पडलेला असायचा. अर्थात् त्याला पार्श्वभूमी देखील तशीच होती.

आपण थोडेसे पार्श्वभूमीकडे वळू या.. 2019 मध्ये भाजप आणि शिवसेना यांची युती होती आणि त्यांना स्पष्ट बहुमत मिळाले होते. पण, ऐनवेळी उद्धव ठाकरे यांनी वेगळी चूल मांडली, आणि मुख्यमंत्रीपदी बसण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्याबरोबर संसार थाटला. नंतर, व्हायचे तेच झाले..जे पेरले तेच उगवले ! भाजपला वाऱ्यावर सोडून त्यांनी गद्दारी केली खरी, पण त्यांच्याच पक्षात मोठी मंडळी होऊन एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील मोठा गट फुटला आणि भाजपाशी हात मिळवणी करून थेट सत्तेवर बसला ! त्या संपूर्ण घडामोडी मागे भाजपा म्हणजेच पर्यायाने देवेंद्र फडणवीस असल्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या टीकेचा रोख फडणवीस यांच्याकडे असणार यात नवल काहीच नव्हते. पण भाषेला कुठेतरी मर्यादा हवी. उद्धव ठाकरे आणि त्यांचे प्रवक्ते संजय राऊत यांनी थेट कमरेखाली वार करण्याचे सुरुवात केली आणि आतापर्यंत त्यांची ती शिवराळ भाषा अजूनही सुरू आहे.

आता, निवडणुकांमध्ये जनतेने खरी शिवसेना ही एकनाथ शिंदे यांचीच आहे हे स्पष्ट केले आणि देवेंद्र फडणवीस हे कसे बरोबर होते हेही दाखवून दिले. उद्धव ठाकरे यांचा गट सपशेल तोंडावर पडला. अशा परिस्थितीत उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या पुढे लोटांगण घातले असून त्यांची नागपूरला जाऊन भेट घेतली आहे. मुख्यमंत्री झाल्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा देण्यासाठी गेलो होतो, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले असले तरी त्यामागील अनेक गुप्त करणे जनतेला माहित आहेत, सर्व उघड्या डोळ्यांनी पाहणारी जनता मूर्ख नक्कीच नाही, हे लक्षात घ्यायला हवे !


(सविस्तर वाचा पान 4 वर)

## पिंपरी-चिंचवड आता

# "@ होम डेस्टिनेशन"!

### परवडणाऱ्या घरांसाठी सव्वातीन हजार अर्ज

### 'पीएमआरडीए'च्या प्राधिकरणातील सदनिकांच्या सोडतीला प्रतिसाद




। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज

**नियोजित पायाभूत सुविधा, अनुकूल वातावरण, जमिनीची उपलब्धता, जवळच्या अंतरावर असलेले विमानतळ, अद्यावत क्रीडा संकुल, मंजूर विकास आराखड्यातील रस्ते रुंदीकरण, सुसज्ज असा पालखी मार्ग, बीआरटी रस्ते, हाकेच्या अंतरावर असणारे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र यामुळे पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) पेठ क्रमांक १२ आणि पेठ क्रमांक ३०-३२ येथील सदनिकांसाठी ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते. त्यास नागरिकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळाला असून, सव्वातीन हजार अर्ज अनामत रकमेसह 'पीएमआरडीए'ला प्राप्त झाले आल आहेत.**

पीएमआरडीएच्या गृहप्रकल्पांतर्गत पेठ क्रमांक १२ येथील प्रधानमंत्री आवास योजनांतर्गत ईडब्ल्यूएसमध्ये ४७ व एलआयजी प्रवर्गातील ६१४ सदनिका आहे. यासह पेठ क्रमांक ३०-३२ येथील ईडब्ल्यूएस (१ आरके) प्रवर्गातील ३४७ व एलआयजी (१ बीएचके) प्रवर्गातील ३२९ सदनिका अशा एकूण १ हजार ३३७ शिल्लक सदनिकांसाठी इच्छुकांकडून १५ डिसेंबरपर्यंत अर्ज मागविले होते.

### ... या सूचना लक्षात ठेवा

- पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सदनिकांसाठी
- तीन हजार २७९ अर्ज अनामत रकमेसह प्राप्त.
- सदनिकांच्या सोडतीची प्रारुप यादी १ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार.
- यावर २ जानेवारीपर्यंत आक्षेप घेता येईल.
- १३ जानेवारीला सोडतीसाठी स्वीकृत अर्जाची अंतिम यादी प्रसिद्ध होईल.
- २२ जानेवारीला अंतिम सोडत काढण्यात येणार आहे.
- पीएमआरडीए संकेतस्थळावर सोडतीमधील यशस्वी व प्रतीक्षा यादीवरील अर्जदारांची नावे प्रसिद्ध होतील.

"पिंपरी-चिंचवड शहरांमध्ये विकासाच्या वाढीचा वेग प्रचंड आहे या शहराला प्रचंड पोटेन्शिअल आहे आजूबाजूला औद्योगिक वसाहत आहे आयटी हब देखील मोठ्या प्रमाणात विकसित झाले आहे त्यामुळे या शहरांमध्ये वास्तव्याला नागरिकांची पसंती मिळत आहे हे पीएमआरडीएच्या गृहप्रकल्पांसाठी नागरिकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळाल्यानंतर दिसून येत आहे. दिलेल्या मुदतीमध्ये ३ हजार २७१ अर्ज प्राप्त झाले आहे.

-हिम्मत खराडे,
सहआयुक्त, जमीन व मालमत्ता विभाग, पीएमआरडीए, पुणे.



# ससूनचे बिल एक कोटीवरुन 50 लाखांवर!

## खर्च कमी करण्यासाठी प्रशासनाने पाऊल उचलले

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालयाचे मासिक वीज देयक सरासरी १ कोटी रुपये आहे. हा खर्च कमी करण्यासाठी ससून रुग्णालय प्रशासनाने पाऊल उचलले आहे. महाविद्यालयासह रुग्णालयाच्या छतावर सौरपॅनेल बसवून ऊर्जानिर्मिती केली जाणार आहे. या माध्यमातून पुढील पाच वर्षांत विजेचा खर्च निम्म्याने कमी करण्याची योजना आखण्यात आली आहे.**




गेल्या काही वर्षांपासून महाविद्यालयासह रुग्णालयाचे मासिक वीज देयक वाढले आहे. हे कमी करण्याबाबत प्रशासनाकडून विचार सुरू होता. अखेर महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या छतावर सौरपॅनेल बसवून सौरऊर्जा निर्मितीचा प्रस्ताव पुढे आला. एका खासगी कंपनीने हे सौरपॅनेल बसवून देण्याची तयारी दर्शविली आहे. सुरुवातीच्या टप्प्यात महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीच्या छतावर सौरपॅनेल बसविण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर आमचे वीज देयक ८ ते १० लाख रुपयांनी कमी होईल, असे महाविद्यालय आणि रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी सांगितले. महाविद्यालय आणि रुग्णालयातील सौरऊर्जा प्रकल्प टप्प्याटप्प्याने कार्यान्वित होईल. पहिल्या वर्षी ८ ते १० टक्के बचत केली जाईल. नंतर प्रत्येक वर्षी सुमारे १० टक्के बचत केली जाईल. यानुसार पाच वर्षांत एकूण वीज वापरापैकी सुमारे ५० टक्के सौरऊर्जेचा वापर केला जाईल. त्यामुळे मासिक वीज देयकात ५० टक्क्यांपर्यंत घट होईल. सध्या महाविद्यालयाला मासिक सुमारे १ कोटी रुपयांचे वीज देयक येते. पुढील पाच वर्षांत हे मासिक वीज देयक ५० लाख रुपयांवर आणण्यात येईल, असेही डॉ. पवार यांनी स्पष्ट केले. विशेष म्हणजे, या प्रकल्पासाठी प्रशासनाला एकही रुपया खर्च करणार नाही. खासगी कंपनीकडून महाविद्यालय आणि रुग्णालयात हा सौरऊर्जा प्रकल्प उभारला जाणार आहे. कंपनी यासाठी कोणतेही शुल्क घेणार आहे. सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून कंपनी हे काम करणार आहे. यामुळे प्रशासनाला कोणताही खर्च न करता वीज देयकामध्ये मोठी बचत करता येणार आहे. गेल्या काही वर्षांपासून महाविद्यालयासह रुग्णालयाचे मासिक वीज देयक वाढले आहे. हे कमी करण्याबाबत प्रशासनाकडून विचार सुरू होता. अखेर महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या छतावर सौरपॅनेल बसवून सौरऊर्जा निर्मितीचा प्रस्ताव पुढे आला. एका खासगी कंपनीने हे सौरपॅनेल बसवून देण्याची तयारी दर्शविली आहे. सुरुवातीच्या टप्प्यात महाविद्यालयाच्या मुख्य इमारतीच्या छतावर सौरपॅनेल बसविण्यात येणार आहेत. पहिल्या टप्प्यात हा प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर आमचे वीज देयक ८ ते १० लाख रुपयांनी कमी होईल, असे महाविद्यालय आणि रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी सांगितले. महाविद्यालय आणि रुग्णालयातील सौरऊर्जा प्रकल्प टप्प्याटप्प्याने कार्यान्वित होईल. पहिल्या वर्षी ८ ते १० टक्के बचत केली जाईल. नंतर प्रत्येक वर्षी सुमारे १० टक्के बचत केली जाईल. यानुसार पाच वर्षांत एकूण वीज वापरापैकी सुमारे ५० टक्के सौरऊर्जेचा वापर केला जाईल. त्यामुळे मासिक वीज देयकात ५० टक्क्यांपर्यंत घट होईल. सध्या महाविद्यालयाला मासिक सुमारे १ कोटी रुपयांचे वीज देयक येते. पुढील पाच वर्षांत हे मासिक वीज देयक ५० लाख रुपयांवर आणण्यात येईल, विशेष म्हणजे, या प्रकल्पासाठी प्रशासनाला एकही रुपया खर्च करणार नाही.

> विजेचा वापर करून अपारंपरिक ऊर्जेचा वापर करण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे ससून रुग्णालय आणि बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयात सौरऊर्जेचा वापर करणार आहोत. यातून विजेचा वापर कमी होऊन खर्चात बचत होण्यासोबत पर्यावरण संरक्षणही होईल.
> -**डॉ. एकनाथ पवार,** अधिष्ठाता, बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय तथा ससून सर्वोपचार रुग्णालय

# 'घटेंगे तो कटेंगे' हेही लक्षात घेतले पाहिजे

## सेवा कार्यात प्रत्येकाने खारीचा वाटा उचलला पाहिजे : सरसंघचालक मोहन भागवत

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सर्व धर्मांचे मूळ शाश्वत धर्म, मानव धर्म आहे. विश्वशांतीची घोषणा करून विश्वशांतीची आम्हाला शिकवण देऊन जगात वर्चस्व स्थापन करण्याचा प्रयत्न होत आहे. युद्ध थांबत नाही, अल्पसंख्याकांवर अत्याचार होतात. अल्पसंख्यांकांची दशा काय हे त्यांनी पाहिले पाहिजे, अशी भूमिका राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मांडली.**

हिंदू अध्यात्मिक सेवा संस्था, शिक्षण प्रसारक मंडळी यांच्यातर्फे स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित हिंदू सेवा महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमात भागवत बोलत होते. रामजन्मभूमी न्यासचे कोषाध्यक्ष गोविंददेव गिरी, महोत्सवाचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन, लाभेश मुनी, गौरांग प्रभू, हिंदू अध्यात्मिक सेवा संस्थेचे अध्यक्ष अशोक गुंदेचा या वेळी उपस्थित होते. भागवत म्हणाले, बाहेरचे लोक येऊन सेवा करतात असाच आजपर्यंतचा समज होता. पण सनातन धर्मपंथांचे लोकही सेवा करतात. त्याची प्रसिद्धी कधी झाली नाही. ज्यांना चांगले व्हायचे असते ते दिखावा न करता चांगले होतात. बाहेरून आलेल्यांनी देशावर राज्य केले. त्यातून आपण आपला इतिहास विसरलो. अशा वेळी आता आपण वाचले पाहिजे, शिकले पाहिजे. त्यामुळे आपली



ताकद दाखवण्याची, आपली शस्त्र दाखवण्याची गरज आहे. जग हे उपभोगाची वस्तू नाही. आजच्या काळात व्यक्तिवादाचा अतिरेक झाला आहे. मी, माझे करिअर असा विचार केला जातो. पण त्याचा अतिरेक होता कामा नये. समाज, कुटुंब, सृष्टीचा विचार केला पाहिजे. सेवा कार्यात प्रत्येकाने खारीचा वाटा उचलला पाहिजे. हिंदू या शब्दाशी तडजोड होता कामा नये. हा एकच शब्द तारणारा आहे. मात्र आजचा काळ वेगळा आहे. आपले काम एकत्रितपणे समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी हा उपक्रम महत्त्वाचा आहे. जातीपातींतून बाहेर येऊन हिंदू म्हणून देशाची सेवा केली पाहिजे. बटेंगे तो कटेंगे तो कळते, तसेच घटेंगे तो कटेंगे हेही लक्षात घेण्याची गरज आहे. देशाला समर्थ करण्यासाठी हिंदूंना समर्थ व्हावे लागेल, असे गोविंददेव गिरी म्हणाले. हिंदू अध्यात्मिक सेवा संस्था, शिक्षण प्रसारक मंडळी यांच्यातर्फे स. प. महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित हिंदू सेवा महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमात भागवत बोलत होते. रामजन्मभूमी न्यासचे कोषाध्यक्ष गोविंददेव गिरी, महोत्सवाचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. एस. के. जैन, लाभेश मुनी, गौरांग प्रभू, हिंदू अध्यात्मिक सेवा संस्थेचे अध्यक्ष अशोक गुंदेचा या वेळी उपस्थित होते. भागवत म्हणाले, बाहेरचे लोक येऊन सेवा करतात असाच आजपर्यंतचा समज होता. पण सनातन धर्मपंथांचे लोकही सेवा करतात. त्याची प्रसिद्धी कधी झाली नाही.

### हिंदू शब्दाशी तडजोड होता कामा नये

ज्यांना चांगले व्हायचे असते ते दिखावा न करता चांगले होतात. बाहेरून आलेल्यांनी देशावर राज्य केले. त्यातून आपण आपला इतिहास विसरलो. अशा वेळी आता आपण वाचले पाहिजे, शिकले पाहिजे. त्यामुळे आपली ताकद दाखवण्याची, आपली शस्त्र दाखवण्याची गरज आहे. जग हे उपभोगाची वस्तू नाही. आजच्या काळात व्यक्तिवादाचा अतिरेक झाला आहे. मी, माझे करिअर असा विचार केला जातो. पण त्याचा अतिरेक होता कामा नये. समाज, कुटुंब, सृष्टीचा विचार केला पाहिजे. सेवा कार्यात प्रत्येकाने खारीचा वाटा उचलला पाहिजे. हिंदू या शब्दाशी तडजोड होता कामा नये. हा एकच शब्द तारणारा आहे.

## आमदार लांडगे यांची लक्षवेधी

# महापालिका प्रशासन 'ॲक्शन मोड'वर!

## चिखली-कुदळवाडीतील अनधिकृत बांधकामे, पत्राशेडवर 'बुलडोझर'

।पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज


**पिंपरी-चिंचवड शहरातील कुदळवाडी-चिखली या भागातील अनधिकृत बांधकामे आणि पत्राशेड, भंगार दुकानांवर महानगरपालिका प्रशासनाने कारवाई सुरू केली आहे. भंगार दुकानांमध्ये वारंवार लागणाऱ्या आगींच्या घटना आणि बांगलादेशी, रोहिंग्यांच्या बेकायदा वास्तव्याबाबत भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी हिवाळी अधिवेशनामध्ये राज्य सरकारचे लक्ष वेधले आणि दोनच दिवसांत 'बुलडोझर' कारवाई सुरू झाली आहे.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने क क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत प्रभाग क्र.०२ मधील मोरे-पाटील चौक ते कुदळवाडी पोलीस चौकी येथे १८ मीटर रुंद डी.पी. रस्ता (३०० मीटर लांबी ) व कुदळवाडी पोलीस चौकी ते विसावा चौक या ३० मीटर रुंद डी.पी.रस्ता ५५० मीटर लाबींच्या डी.पी.रस्ता रस्त्याच्या दुतर्फा सुमारे ९ हजार चौ.मी. क्षेत्रातील ३० आर.सी.सी.बांधकामे, तसेच सुमारे ४ हजार चौ.मी. क्षेत्रामधील ४५ वीट बांधकामांसह पत्राशेड इत्यादीवर अतिक्रमण जमीनदोस्त करण्यात आले आहे.

तसेच, गेल्या दोन दिवसांमध्ये चिखली- कुदळवाडी परिसरातील एकूण १३ हजार चौ.मी. आर.सी. सी.बांधकामे व पत्राशेडवर कारवाई करण्यात आली. यामधील बहुतांशी भंगार व्यावसायिकांचे अनधिकृत दुकाने होती. मंजूर विकास आराखड्यातील रस्ते विकसित करणेकामी कारवाई या पुढेही सुरु राहील, असा इशाराही महानगरपालिका प्रशासनाने दिला आहे.

वारंवार लागणाऱ्या आगीच्या घटनांमुळे सोसायटीधारक, स्थानिक नागरिक यांच्या सुरक्षेच्या प्रश्न निर्माण झाला होता. यासह बेकायदेशीरपणे भंगार जाळून रसायनमिश्रीत पाणी इंद्रायणी नदी पात्रात सोडल्यामुळे नदी प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. यासह आगीच्या घटना, बेकायदेशीर भंगार साठवणूक यामुळे या भागात असुरक्षितता, अस्वच्छता आणि पर्यावरणाची हानी होत आहे. विशेष म्हणजे, बांगलादेशमधून बनावट कागदपत्रांच्या आधारे पिंपरी-चिंचवडमध्ये वास्तव्य करणारे बांगलादेशी आणि रोहिंग्या बहुतेक करुन भंगार, रद्दी दुकानांमध्ये काम करीत आहेत. ही बाब पोलीस प्रशासनाने केलेल्या कारवाईमध्ये समोर आली आहे. त्यामुळे या कारवाईचे स्थानिक नागरिकांमधून स्वागत होत आहे.



> पिंपरी-चिंचवडसह देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अवैधपणे वास्तव्य करणारे बांगलादेशी आणि रोहिंगे यांना प्रतिबंध करणे काळाची गरज आहे. विशिष्ठ समाजाचे लांगुलचालन करण्यासाठी यापूर्वीच्या काळात प्रशासन आणि राजकीय दबाव निर्माण केला जात होता. मात्र, महायुतीच्या सत्ताकाळात कोणत्याही परिस्थितीमध्ये देशविघात कृत्यांचे समर्थन केले जाणार नाही. अनधिकृत भंगार दुकाने आणि बेकायदेशीर व्यावसायिकांवर कारवाईची मोहीम सुरू राहणार आहे. स्थानिक नागरिक आणि पिंपरी-चिंचवडकरांनी सहकार्य करावे. तसेच, पोलीस प्रशासनाने कोणताही अनूचित प्रकार घडणार नाही. याची पूर्णत: काळजी घ्यावी.
>
> **–महेश लांडगे,** आमदार, भोसरी, विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

---

## संरक्षण खात्याच्या ताब्यातील डी.पी.रस्त्याच्या कामाला सुरुवात

## माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांच्याकडून महापालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांसोबत पाहणी

।पिंपळे सौदागर।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रभाग क्र. २८ पिंपळे सौदागर येथील संरक्षण खात्याच्या ताब्यात असलेल्या क्रिस्टल हॉटेल, ट्रायोज सोसायटी ते नॅचरल आइस्क्रीम कॉर्नर जोडला जाणाऱ्या रस्त्याच्या संरक्षण भिंतीच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. माजी विरोधी पक्षनेता विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी महापालिकेकडे या कामासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केला होता. या कामाची आज महापालिकेचे संबंधित अधिकारी, स्थापत्य विभागाचे डेप्युटी सुनील शिंदे, क्लीम्सी कन्स्ट्रक्शनचे हबीब, सल्लागार प्रतिनिधी यांच्यासोबत पाहणी केली.**



हा रस्ता १८ मीटर रुंद आणि ९२० मीटर लांबीचा 'डीपी' रस्ता आहे. या रस्त्याच्या निर्मितीसाठी १४ कोटी ८२ लाख ८९ हज़ार रुपयांची निविदा मंजूर करण्यात आली आहे.

### नागरिकांनी व्यक्त केले समाधान

हिंजवडी आणि वाकडकडे जाणाऱ्या वाहनांसाठी एक सोयीचा मार्ग ठरणार आहे. प्रवासाच्या वेळेत बचत होणार आहे. रस्त्याचे कॉंक्रिटीकरण १० मीटर रुंदीचे राहणार असून वाहन चालकांना सुकर प्रवास अनुभवता येईल. तसेच पादचारी आणि सायकलस्वारांच्या सुरक्षेचा विचार करून हा रस्ता बनविला गेला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना २ मीटर रुंद पदपथ आणि एका बाजूस १.५ मीटर रुंद सायकल ट्रॅक तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे येथील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

संरक्षण खात्याच्या ताब्यात असलेल्या जागेचे महापालिकेकडे हस्तांतरण झाले असून दोन्ही बाजूंच्या समन्वयामधून हे काम शक्य झाले आहे.

या रस्त्यामुळे नाशिक फाटा ते जगताप डेअरी या बीआरटी मार्गालगतच्या स्वराज गार्डन, क्रिस्टल हॉटेल, योगा पार्क, आणि ट्रायोज सोसायटीकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होणार आहे. हा रस्ता नाशिक फाट्याकडून कोकणे चौकाकडे जाणाऱ्या मार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करणारा आहे. तसेच काटे वस्ती, गोविंद गार्डन आणि ट्रायोज सोसायटीकडे वाहने सहज जाऊ शकतील. त्यामुळे वाहतूक सुरळीत होईल आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळेल.

या रस्त्यामुळे परिसरातील सुमारे पंचवीस हजार नागरिकांना लाभ होणार आहे. नाशिक फाटा, कोकणे चौक आणि गोविंद गार्डन परिसरातील वाहतूक कोंडी कमी होणार आहे.

# देवाभाऊ, तुस्सी ग्रेट हो!

**शिल्लक शिवसेना म्हणजेच उबाठा गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेणे, साहजिकच सर्वांसाठी चर्चेचा विषय आहे ! कारण, गेली पाच वर्षे उद्धव ठाकरे यांनी देवेंद्रजी म्हणजे देवाभाऊंबाबत बोलताना एकही शिवी शिल्लक ठेवली नसेल. त्यांची प्रत्येक पत्रकार परिषद किंवा जाहीर सभा ही देवाभाऊंवर शिव्यांची लाखोली वाहण्यासाठीच होती की काय ? असा बहुतेकांना प्रश्न पडलेला असायचा. अर्थात् त्याला पार्श्वभूमी देखील तशीच होती.आपण थोडेसे पार्श्वभूमीकडे वळू या.. 2019 मध्ये भाजप आणि शिवसेना यांची युती होती आणि त्यांना स्पष्ट बहुमत मिळाले होते.**



पण, ऐनवेळी उद्धव ठाकरे यांनी वेगळी चूल मांडली, आणि मुख्यमंत्रीपदी बसण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्याबरोबर संसार थाटला. नंतर, व्हायचे तेच झाले.. जे पेरले तेच उगवले ! भाजपला वाऱ्यावर सोडून त्यांनी गद्दारी केली खरी, पण त्यांच्याच पक्षात मोठी मंडळी होऊन एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील मोठा गट फुटला आणि भाजपाशी हात मिळवणी करून थेट सत्तेवर बसला ! त्या संपूर्ण घडामोडी मागे भाजपा म्हणजेच पर्यायाने देवेंद्र फडणवीस असल्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या टीकेचा रोख फडणवीस यांच्याकडे असणार यात नवल काहीच नव्हते. पण भाषेला कुठेतरी मर्यादा हवी. उद्धव ठाकरे आणि त्यांचे प्रवक्ते संजय राऊत यांनी थेट कमरेखाली वार करण्याचे सुरुवात केली आणि आतापर्यंत त्यांची ती शिवराळ भाषा अजूनही सुरू आहे.

आता, निवडणुकांमध्ये जनतेने खरी शिवसेना ही एकनाथ शिंदे यांचीच आहे हे स्पष्ट केले आणि देवेंद्र फडणवीस हे कसे बरोबर होते हेही दाखवून दिले. उद्धव ठाकरे यांचा गट सपशेल तोंडावर पडला. अशा परिस्थितीत उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या पुढे लोटांगण घातले असून त्यांची नागपूरला जाऊन भेट घेतली आहे. मुख्यमंत्री झाल्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा देण्यासाठी गेलो होतो, असे  उद्धव ठाकरे यांनी सांगितले असले तरी त्यामागील अनेक गुप्त करणे जनतेला माहित आहेत, सर्व उघड्या डोळ्यांनी पाहणारी जनता मूर्ख नक्कीच नाही, हे लक्षात घ्यायला हवे !

### आठवा, उद्धव ठाकरे काय म्हणाले होते?

उद्धव ठाकरे यांनी देवेंद्र फडणवीस यांची दहा मिनिटे का होईना भेट घेतली आणि अनेकांच्या भुवया उंचावल्या. ‘एक तर तू राहशील, नाही तर मी राहीन’ ने सुरु झालेला प्रवास भेटीसाठी वेळ मागून भेट घ्यायला येईपर्यंत आला.. देवेंद्रजींनी कधीही पोकळ धमक्या दिल्या नाहीत, की दंड सरसावत आगपाखड केली नाही.. शांतपणे थंड डोक्याने गेम केला.. शरद पवार असोत अथवा उद्धव ठाकरे.. एकाच वेळी तीन चार राजकीय शत्रूंना  शिंगावर घेऊन प्रसंगी धोबीपछाड मारणारा राजकारणी म्हणून देवेंद्रजींची वेगळी ओळख महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात कायम राहील ! कोणे एके काळी ‘बामनाचं पोरगं’, ते आता आता पर्यंत ‘टरबुज्या’ म्हणून झालेली अवहेलना, हलाहल समजून पचवून, ब्राह्मणद्वेषी राजकारणावर मात करून देवेंद्रजी ‘अठरापगड जातींच्या कणखर, पवित्र देशा महाराष्ट्रा देशा’ चा मुख्यमंत्री म्हणून विराजमान झाला आहे आणि त्याच ‘बामनाच्या पोराला’ राजकीय आयुष्यातून उठवण्याची भाषा करणारे आज विनवण्याकरून भेटीची वेळ मागत आहेत ! आगामी काही दिवसात शरद पवार ती सुद्धा उद्धव ठाकरे यांच्याप्रमाणे भेटायला आले तर नवल वाटायला नको! जे देवेंद्र फडणवीस यांना जवळून ओळखतात, ते नक्की सांगतील, की हा देवेंद्र यांचा स्वभाव नाही! ‘मी माझा बदला पूर्ण केला’ या त्यांच्या वक्तव्यानंतर ‘मी असं म्हणायला नको होतं’ असं म्हणणाऱ्या देवेंद्र यांच्या मनांत एक मुख्यमंत्री म्हणून विधान परिषदेच्या साध्या आमदार उद्धव ठाकरेंना भेटतांना काय भावना आल्या असतील? एकच भावना आली असेल, ‘एक वर्तुळ पूर्ण झालं, चला कामाला लागू यात’! या मधल्या काळात त्यांनी देवेंद्रजींचा अगदी शेलक्या भाषेत उद्धार केला हे सर्वांना माहित आहे. फडतूस म्हणाले, कलंक म्हणाले, हाकलून द्या, लाथा घाला वगैरे शब्दांचा उद्धार झाला. खंजीर, गद्दार, औरंगजेबाची औलाद येथ पासून ते भिकारड्यापर्यंत सर्व शब्दांचा पाढा वाचला गेला. उद्धव ठाकरे यांचा पारा दिवसेंदिवस चढत होता, तर देवेंद्रजी हे सर्व शांतपणे पाहत होते. कदाचित, त्यांना कल्पना होती की महाराष्ट्रातील जनता सूज्ञ असून ती आपल्याच पाठीशी उभे राहणार आहे.. शेवटी त्यांना अपेक्षित तो दिवस उगवला.. उद्धव यांनी भेटण्यासाठी वेळ मागितली.. एकाची अभिमानाने छाती फुगली तर दुसऱ्याने लोटांगण घातले, हे जनतेने पाहिले.

### नागपूरमधील भेटीने राजकीय चर्चा!

मूळ सांगायचा मुद्दा हा, की गेल्या अडीच वर्षांपासून ज्यांनी एकमेकांकडे सरळ तोंडाने बघितले नाही, ज्यांच्यावर अगदी टोकाची भूमिका घेत टीका केली, त्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उद्धव ठाकरे यांनी नागपुरात भेट घेतली. उद्धव ठाकरे हे देवेंद्र फडणवीसांच्या कार्यालयात भेट घेण्यासाठी पोहोचले, अन संपूर्ण महाराष्ट्र अवाक झाला. उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, अनिल परब यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या दालनात ते पोहोचले. आपल्या हातातील बुके देऊन फडणवीसांचे अभिनंदनही केले. त्यानंतर, हात जोडून ते निघाले असता देवेंद्र फडणवीसांनी या बसा.. असे म्हणत बसण्याचा आग्रह केला. त्यानंतर, उद्धव ठाकरेंनी देखील खाली बसून त्यांच्यासोबत 6 ते 7 मिनिटे चर्चा केली. या दोघांच्या भेटीचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. त्यामध्ये, सोफ्यावर बसून दोन्ही नेते चर्चा करताना दिसत आहेत. या भेटीने राजकीय वर्तुळात अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. दरम्यान, ही सदिच्छा भेट होती, दोन्ही नेत्यांचे अभिनंदन करण्यासाठीची ही भेट होती, असे सांगण्यात आले. ही केवळ सदिच्छा भेट होती, आम्ही निवडणूक जिंकू शकलो नाही, महायुती निवडणूक जिंकली आहे . त्यामुळे आता महाराष्ट्राच्या हिताची कामे होतील अशी अपेक्षा आहे. हे सरकार कसे आले ते आम्ही जनतेच्या माध्यमातून आवाज उठवणार आहोत, असे उद्धव ठाकरेंनी देवेंद्र फडणवीसांच्या भेटीनंतर पत्रकारांशी बोलताना म्हटले असले तरी सुषमा अंधारे यांनी नेहमीच फडणवीस हे शिवसेना पक्ष फुटीतले खलनायक असल्याचा आरोप केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटीबाबत बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या की, याबाबत भुवया उंचावण्याचे काही कारण नाही. देवेंद्र फडणवीस हे फक्त एक व्यक्ती नाहीत तर एका राज्य संस्थेचे प्रमुख म्हणून त्यांना भेटायला उद्धव ठाकरे गेले होते. कोणाला काय म्हणायचे ते म्हणोत.. पण बुद्धिबळाच्या या सारीपटावरील बाजी देवेंद्रजी फडणवीस यांनी मारली आहे, सर्व विरोधकांना गलितगात्र करून त्यांनी सत्ता पटकावली आहे. आणि बहुमत सुद्धा एवढे आहे की पुढील पाच वर्षे त्यांना तसूभरही धोका नाही. महाराष्ट्राच्या राजकारणात पुढे आलेले हे फडणवीस नावाचे वादळ पुढील कित्येक वर्षे असेच घोंगावत राहणार आहे आणि विरोधकांचा पाला पाचोळा करणार आहे, हे नक्की! सध्या एवढेच म्हणावे वाटते की देवा भाऊ, तुस्सी ग्रेट हो!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बहिणींना डिसेंबरचे पैसे मिळणार!

## फडणीस यांनी योजनेबाबत महत्त्वाची माहिती दिली

। मुंबई ।
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**विधानसभेतील गुरुवारच्या सत्रात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी लाडकी बहीण योजनेबाबत महत्त्वाची माहिती दिली आहे. फडणवीस म्हणाले, आमची एकही योजना बंद होणार नाही आहे. लाडकी बहीण योजना सुरूच राहणार आहे. अधिवेशन संपतात सर्व लाडक्या बहिणींना डिसेंबरचे पैसे मिळणार आहेत.**



महायुती सरकारने आपल्या मागील काळातील अंतरिम अर्थसंकल्पादरम्यान मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेची घोषणा केली होती. खूप कमी वेळातच ती योजना लोकप्रिय झाली. याचा काहीसा परिणाम मतपेटीवर देखील पाहायला मिळाला आहे. ज्यामुळे महायुतीला पुन्हा सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा झाला. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना जुलैपासून सुरु झाली. जुलै ते नोव्हेंबर असे पाच महिन्याचे हफ्ते लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा झाले आहेत. आता महायुती सरकारच्या नव्या कार्यकाळात पुढील हफ्ता कधी जमा होणार? किती पैसे जमा होणार? याबद्दल बहिणींना उत्सुकता लागली आहे. हिवाळी अधिवेशनादरम्यान सरकार काय घोषणा करणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. विधानसभेतील गुरुवारच्या सत्रात बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी अर्जदारांनाही आश्वासित केले आहे. आम्ही जी आश्वासने दिली, ती आम्ही पूर्ण करणार आहोत. याबद्दल कुणीही शंका ठेऊ नये. योजनेच्या कोणत्याही निकषात बदल करण्यात आलेले नाहीत. ज्यांनी अर्ज केला त्या सर्वांना पैसे देणार आहोत. असेही फडणवीसांनी नमूद केले. प्रामुख्याने आर्थिक निकषावर ही योजना सुरु करण्यात आली आहे. गरीब महिलांना आर्थिक आधार देण्यासाठी या योजनेची घोषणा करण्यात आली आहे. ज्या कुटुंबांचं वार्षिक उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी आहे, अशा महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. तर २१ ते ६५ वयोगटातील महिलांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. निकषात बसणाऱ्या प्रत्येक अर्जदार महिलेला या योजनेचा लाभ मिळत आहे. या योजनेंतर्गत महिलांच्या खात्यात आतापर्यंत दर महिन्याला १५०० प्रमाणे पाच हफ्ते जमा झाले आहेत.“विधानसभा निवडणुकीत मतदार होते ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९. यापैकी मतदान झालं ६ कोटी ४० लाख ८८ हजार १९६. म्हणजे ६६.५ टक्के. सकाळी ७ ते ९ यादरम्यान ६.६१ टक्के म्हणजे ६४ लाख १३ हजार ३६०. सकाळी ९ ते ११ मध्ये ११.५३ टक्के. म्हणजे १ कोटी ११ लाख ८६ हजार ९९६ मतं. सकाळी ११ ते दुपारी १ दरम्यान १४ टक्के मतदान झालं. म्हणजे १ कोटी ३६ लाख २२ हजार ३२७. दुपारी १ ते ३ मध्ये १३.३५ टक्के. म्हणजे १ कोटी २९ लाख ५२ हजार ८५३. दुपारी ३ ते ५ दरम्यान १२.६९ टक्के मतदान झालं. म्हणजे १ कोटी २३ लाख १२ हजार ४८८. संध्याकाळी ५ ते ६ या वेळात ६ पूर्वी जेवढे लोक रांगेत उभे राहतात, त्या सगळ्यांना आपण मतदान करू देतो. अनेक ठिकाणी रात्री ८ पर्यंत मतदान चालतं. या वेळेत ७५ लाख ९७ हजार ०६७ लोकांनी मतदान केलं. महाराष्ट्रात एक लाख मतदान केंद्र आहे. त्यामुळे प्रत्येक मतदान केंद्रावर सरासरी ७५ लोकांनी मतदान केलं आहे. ५ वाजेपर्यंत ५८.२२ टक्के मतदान झालं. अंतिम आकडेवारी आली ६६ टक्के. म्हणजे ७.८३ टक्क्यांनी मतदान वाढलं”, असं सांगत देवेंद्र फडणवीसांनी सविस्तर आकडेवारी मांडली. या आकडेवारीचं विरोधकांच्या आरोपांनुसार देवेंद्र फडणवीसांनी स्पष्टीकरणही दिलं. “सरासरी प्रत्येक तासाला ५.८३ टक्के मतदान झालं आहे. सरासरी ताशी मतदान जवळपास ६० लाखांचं आहे. प्रतिमिनिट मतदान जवळपास ९७ हजार १०३ इतकं आहे. याचा अर्थ एकूण विचार करता ६ वाजेनंतरच्या मतदानाचा हिशेब लावला तर ते फक्त १७ लाख इतकं आहे”, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.निवडणूक निकालांनंतर मारकडवाडी ग्रामस्थांनी केलेला पेपरवरील मतदानाचा प्रयत्न प्रशासनाने बंद पाडला. त्यावरून बराच गदारोळ झाला. त्यावर फडणवीसांनी स्पष्टीकरण दिलं आहे. यासंदर्भात त्यांनी शरद पवारांना लक्ष्य केलं आहे. “मला बाकी कुणाचं आश्चर्य वाटलं नाही. मला फक्त शरद पवारांचं आश्चर्य वाटलं. कारण शरद पवार देशातले अत्यंत तटस्थ नेते आहेत. याआधी काँग्रेसनं अनेकदा ईव्हीएमचा मुद्दा मांडला. पण शरद पवारांनी तो कधीच मांडला नाही. यावेळी मात्र शरद पवारांनी पहिल्यांदाच नवीनच लॉजिक आणलं.

### दादागिरी खपवून घेतली जाणार नाही

कारण परवा जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले की ईव्हीएमवर बोलणं सोडून द्या. ममता दीदींनीही हाच सल्ला दिला”, असं म्हणत देवेंद्र फडणवीसांनी काँग्रेसलाही टोला लगावला.“राम सातपुतेंसारखा सर्वसामान्य कार्यकर्ता पाच वर्षं राबतो आणि एकट्या मारकडवाडीत २२ कोटींची कामं करतो. पण त्याला जास्त मतं मिळाल्यावर तुम्ही लोकांना जाऊन धमकावता? तिथे लोकांना धमकावण्यात आलं की बॅलेटवर मतदान घ्यायचं आणि मत मिळायला हवं राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाला. ही कोणती लोकशाही आहे? जिथे मतं मिळत नाहीत, तिथे जाऊन दादागिरी करायची? लोकशाहीत दादागिरी खपवून घेतली जाणार नाही”, अशा शब्दांत फडणवीसांनी विरोधकांना इशारा दिला.

# छगन भुजबळ यांचं पंतप्रधान मोदी यांना पत्र

## मी आमदार होणं किंवा मंत्री होणं हे माझं काम नाही : भुजबळ

। मुंबई ।
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे आमदार छगन भुजबळ यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहलं आहे. मंत्रिमंडळातून वगळलं गेल्याने छगन भुजबळ नाराज आहेत. नाशिक या ठिकाणी त्यांनी समता परिषदेचा मेळावा घेतला आणि आपली भूमिका मांडली. दरम्यान छगन भुजबळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींना उद्देशून एक पत्र लिहिलं आहे.**



मी आमदार होणं किंवा मंत्री होणं हे माझं काम नाही. मला मंत्रिपदाची हाव असती तर मी १६ नोव्हेंबरला राजीनामा देऊन १७ नोव्हेंबरला आलो नसतो. मी राजीनामा दिला होता पण उल्लेख केला नाही कारण मला तसे फोन सारखे येत होते. मी राजीनामा दिला होता हे मी अडीच महिन्यांनी सांगितलं. माझ्याविरोधात अर्वाच्य बोललं गेलं तेव्हा मी सांगितलं. प्रश्न फक्त मंत्रिपदाचा नाही तर अस्मितेचा आहे. एखाद्या समाजाला बरोबर घेऊन लढणारी माणसं आपल्याकडे आहेत. कुणीही दुःखात राहण्याचं कारण नाही. कभी डर न लगा मुझे फासला देखकर, मै बढता गया रास्ता देख कर, खुदही खुद नजदिक आती गयी मंजिल मेरा बुलंद हौसला देखकर”, असं छगन भुजबळ ( Chhagan Bhujbal ) यांनी नाशिकमध्ये कार्यकर्त्यांशी बोलताना म्हटलं होतं. त्यानंतर आता त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहिलं आहे.लाल कांद्याच्या दरात सातत्याने घसरण होत असल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे राज्यातील कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क माफ करण्यात यावे, अशी मागणी आपण देशाचे पंतप्रधान माननीय नरेंद्रजी मोदी, केंद्रीय वाणिज्यमंत्री मा. पीयूषजी गोयल यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. तर महाराष्ट्रातील कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क माफ करण्यासाठी केंद्र शासनाकडे शिफारस करावी, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

### नुकसानीचे महत्वाचे कारण

कांद्याची सर्वात मोठी बाजारपेठ असून येथून मोठ्या प्रमाणात कांदा निर्यात होते. सद्यस्थितीत उन्हाळ कांद्याचे उत्पादन संपले असून लाल कांद्याची बाजार समित्यांमध्ये मोठ्या प्रमाणात आवक होत आहे, मात्र कांद्याचे दर घसरल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीतया आहे. आधीच बिगरमोसमी पाऊस व बदलत्या वातावरणामुळे त्रस्त असताना आता उत्पादन खर्चापेक्षाही कमी दर मिळत असल्याने कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे. लाल कांदा टिकाऊ नसल्याने तात्काळ विक्री करावी लागते, हेही नुकसानीचे महत्वाचे कारण आहे, असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे.

# भाजपाकडून आमच्यावर हल्ला!

## अदाणी देशाला लुटत आहेत या मुद्द्यावरही आंदोलन केलं: खरगे

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सध्या देशात असलेलं सरकार खासकरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांबाबत जी वक्तव्यं करत आहेत ती क्लेशदायक आहेत. कुठलाही पडताळा न करता त्यांनी आरोप केले आहेत. सत्य काय आहे ते आधी जाणून घ्या त्यानंतर पंडित नेहरुंना दुषणं द्या, डॉ. आंबेडकरांचा अपमान करा. हे सगळं जाणीवपूर्वक केलं जातं आहे असा आरोप मल्लिकार्जुन खरगेंनी केला.**



आजपर्यंत बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरुंबाबत जे काही सांगितलं आहे ते खोटं आहे. आज संसदेत जे काही घडलं ते योग्य नाही. लोकसभा, राज्यसभा या ठिकाणी अशा गोष्टी घडू नयेत हाच आमचा प्रयत्न असतो. आम्ही कुठलाही अडथळा आणलेला नाही. १४ दिवस सभागृहं कशी चालतील याकडेच आम्ही लक्ष दिलं आणि मग आंदोलन केलं" असंही खरगे म्हणाले.आमच्याकडे हा मुद्दा होता की अदाणी देशाला लुटत आहेत आणि त्या मुद्द्यावरुन आम्ही सरकारला प्रश्न करत होतो. त्यानंतर काही दिवसांपूर्वी संविधानाबाबत चर्चा सुरु झाली त्यावेळी अमित शाह यांनी जे वक्तव्य केलं त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची खिल्ली उडवली. तुम्ही किती वेळा आंबेडकर-आंबेडकर असं म्हणता, त्याऐवजी तुम्ही देवाचं नाव घेतलं तर तुम्ही सात जन्म स्वर्गात असता. एखाद्या पक्षाची जर ही मानसिकता असेल, एखाद्या नेत्याची आहे तर ती निषेधार्ह आहे. अशा गोष्टी तुम्ही देशापुढे ठेवणार असाल तर काय बोलणार? एवढंच नाही तर त्यांच्यापैकी कुणीही चूक मान्य करायला तयार नाही. अमित शाह यांनी राजीनामा दिला पाहिजे किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्यावर कारवाई करावी ही मागणी आहे. त्यामुळे आम्ही हा मुद्दा जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी आम्ही हा मुद्दा पुन्हा समोर आणला. आमच्या पक्षाचे सगळे खासदार आम्ही एकत्र आलो आम्ही काय म्हटलं? तर अमित शाह यांनी माफी मागावी. संपूर्ण भारतात यासाठी आंदोलन होतं आहे. मात्र या विषयावरुन लक्ष वेधलं जावं म्हणून दुसरे मुद्दे काढले जात आहे. आम्ही बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यापासून आंदोलन सुरु केलं. त्यानंतर शांततापूर्ण मार्गाने आम्ही रांगेत चाललो होतो. त्यावेळी भाजपाच्या खासदारांना काय झालं ते मला माहीत नाही. मकरद्वार या ठिकाणी भाजपा खासदार आले आणि त्यांनी आम्हाला रोखलं. मसल पॉवर दाखवू लागले. त्या ठिकाणी इतके खासदार मोठ्या प्रमाणावर होते. आमच्या बरोबर ज्या महिला खासदार होत्या त्यांनाही रोखण्यात आलं. आमच्यावर हल्ला करण्यात आला. मला धक्का देण्यात आला, त्यावेळी माझा तोल सुटला आणि मी पटकन खाली बसलो. आता ते आमच्यावर आरोप करत आहेत की आम्ही धक्काबुक्की केली. मी कुणाला धक्का देण्याच्या स्थितीतही नाही. मात्र सत्ताधारी पक्षाचे खासदार आमची खिल्ली उडवत होते असाही आरोप मल्लिकार्जुन खरगेंनी केला.अशा पद्धतीने जे काही वातावरण संसदेत तयार करण्यात आलं ते भाजपा खासदारांचं कृत्य गैर आहे. आम्ही हे कधीही सहन करणार नाही. याविरोधात आम्ही आता आंदोलन उभं करणार आहोत. शांततापूर्ण पद्धतीने संसदेचं कामकाज सुरु होतं ती शांतता भंग करण्याचं काम भाजपा सरकारने केलं आहे. असा आरोप मल्लिकार्जुन खरगेंनी केला. त्यांच्याकडे आता बोलायला काहीही मुद्दे उरलेले नाहीत. खाया पिया कुछ नहीं ग्लास तोडा बाराह आना असं भाजपाचं धोरण आहे. असंही मल्लिकार्जुन खरगेंनी म्हटलं आहे.आजपर्यंत बाबासाहेब आंबेडकर, पंडित नेहरुंबाबत जे काही सांगितलं आहे ते खोटं आहे. आज संसदेत जे काही घडलं ते योग्य नाही. लोकसभा, राज्यसभा या ठिकाणी अशा गोष्टी घडू नयेत हाच आमचा प्रयत्न असतो. आम्ही कुठलाही अडथळा आणलेला नाही. १४ दिवस सभागृहं कशी चालतील याकडेच आम्ही लक्ष दिलं आणि मग आंदोलन केलं" असंही खरगे म्हणाले.

### डॉ. आंबेडकर यांची खिल्ली उडवली

आमच्याकडे हा मुद्दा होता की अदाणी देशाला लुटत आहेत आणि त्या मुद्द्यावरुन आम्ही सरकारला प्रश्न करत होतो. त्यानंतर काही दिवसांपूर्वी संविधानाबाबत चर्चा सुरु झाली त्यावेळी अमित शाह यांनी जे वक्तव्य केलं त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची खिल्ली उडवली. तुम्ही किती वेळा आंबेडकर-आंबेडकर असं म्हणता, त्याऐवजी तुम्ही देवाचं नाव घेतलं तर तुम्ही सात जन्म स्वर्गात असता. एखाद्या पक्षाची जर ही मानसिकता असेल, एखाद्या नेत्याची आहे तर ती निषेधार्ह आहे. अशा गोष्टी तुम्ही देशापुढे ठेवणार असाल तर काय बोलणार? एवढंच नाही तर त्यांच्यापैकी कुणीही चूक मान्य करायला तयार नाही. अमित शाह यांनी राजीनामा दिला पाहिजे किंवा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी त्यांच्यावर कारवाई करावी ही मागणी आहे. त्यामुळे आम्ही हा मुद्दा जनतेपर्यंत पोहचवण्यासाठी आम्ही हा मुद्दा पुन्हा समोर आणला.

# मुंबईला केंद्रशासित प्रदेश घोषित करा

## बेळगावला केंद्रशासित प्रदेश करण्याची आमदारांची मागणी

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील बेळगावात सीमावाद सुरू असतानाच कर्नाटकच्या एका आमदाराने आता थेट मुंबईला केंद्रशासित प्रदेश करण्याची मागणी केली आहे. कर्नाटकात विधानसभेचे हिवाळी अधिवेशन सुरू आहे. या अधिवेशनात उत्तर कर्नाटकातील विकासाचा मुद्दा चर्चेत होता. या चर्चेदरम्यान अथणी विधानसभा मतदारसंघाचे आमदार लक्ष्मण सवदी यांनी मुंबईला केंद्रशासित प्रदेश करण्याची मागणी केली.**



गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्र-कर्नाटकातील सीमावाद पेटला आहे. महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कार्यक्रमाला कर्नाटक सरकारने परवानगी नाकारल्यानंतर सीमावाद अधिक चिघळला. तेव्हा महाराष्ट्रातील आदित्य ठाकरेंसह अनेक आमदारांनी बेळगावला केंद्रशासित प्रदेश करण्याची मागणी केंद्र सरकारकडे केली होती. यावरून अनेक आरोप-प्रत्यारोपही झाले होते. आता हाच मुद्दा थेट कर्नाटकच्या विधानसभेत मांडण्यात आला आहे.आमदार लक्ष्मण सवदी म्हणाले, "महाराष्ट्रातील बुद्धिभ्रष्ट झालेल्या एका नेत्याने बेळगावसह सीमाभाग केंद्रशासित करावा असं वक्तव्य केलंय. यासंदर्भात माध्यमांनी आम्हाला प्रश्न विचारले. त्यावेळी संबंधित नेत्यांची मती भ्रष्ट झाल्याचं मी स्पष्टपणे सांगितलं होतं. कर्नाटकचा अविभाज्य अंग असलेला बेळगाव सीमाभाग केंद्रशासित करायचा असेल तर मुंबई देखील केंद्रशासित करावी अशी आम्ही मागणी केली पाहिजे."ते पुढे म्हणाले, आमचे पूर्वज मुंबईत वास्तव्यास होते. त्यामुळे आमचाही मुंबईवर अधिकार आहे, असं आम्ही म्हणू शकतो. कारण पूर्वी बेळगावसह अन्य सहा जिल्हे मुंबई प्रांताचा भाग असताना आमचे कर्नाटकातील लोक मुंबईला जात होते. त्याठिकाणी वास्तव्य करत होते. त्यामुळे आमचाही मुंबईवर हक्क आहे. म्हणून प्रथम मुंबई केंद्रशासित केली जावी आणि तसा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवावा, असं लक्ष्मण सवदी म्हणाले.लक्ष्मण सावदी एवढंच बोलून शांत न बसता ते पुढे म्हणाले, महाराष्ट्राला बेळगाव हवे असेल.

### ..तर मुंबई कर्नाटकात घ्यावे

मुंबई केंद्रशसित करण्याची मागणी निषेधार्ह आहे. काँग्रेस असो वा भाजप... कोणताही पक्ष असो... मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याची भाषा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) अजिबात खपवून घेणार नाही. मुंबई ही आमची मायभूमी आहे.
इथला प्रत्येक कण मराठी माणसानं आपलं रक्त सांडून मिळवला आहे. मुंबई आम्हाला कोणी आंदण दिलेली नाही. काँग्रेसच्या पक्षश्रेष्ठींनी आपल्या आमदारांना समज द्यावी", असं आदित्य ठाकरेंनी एक्स पोस्टमध्ये म्हटलं आहे.

# आशकानं दिली गोड बातमी!

टिव्ही मनोरंजन विश्वातून एक आनंदाची बातमी समोर आली आहे. नागिन फेम अभिनेत्री आशका गोराडिया ही आई झाली आहे. तिने एका गोंडस मुलाला जन्म दिला आहे. आशका गोराडिया आणि ब्रेंट ग्लोब यांनी त्यांच्या पहिल्या बाळाचे स्वागत केले आहे. स्वत: अभिनेत्रीनेच या वृत्ताला दुजोरा दिला आहे. आशका गोराडिया आणि ब्रेंट ग्लोब यांनी सोशल मिडियावर पोस्ट शेयर करत ही गोड बातमी चाहत्यांनी दिली आहे. यासोबतच त्यांनी सोशल मिडियावर बाळाचा पहिला फोटो आणि नावही जाहिर केलं आहे. हा फोटो पोस्ट करत त्याने कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, 'आज सकाळी 7:45 वाजता विल्यम अलेक्झांडर या जगात आला आणि थेट आमच्या हृदयात गेला. जरी मला माहित आहे की माझे जीवन या दिवसापूर्वीही अस्तित्वात होते, मला त्याबद्दल फारच कमी आठवते. आतापासून, मी मरेपर्यंत ॲलेक्सचा बाबा असेन. देवाच्या कृपेने आशकाने त्याला जन्म दिला आहे. ती आता विश्रांती घेत आहे, तिच्या शेजारी आमचे लहान बाळ आहे. आमचे अंतःकरण इतके जड कधीच नव्हते. असे प्रेम मी कधीच पाहिले नाही. आणि आता दररोज, माझ्याकडे देवाच्या अस्तित्वाचा जिवंत पुरावा असेल. आता त्यांची ही पोस्ट सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. चाहते या जोडाप्याचे कौतुक करत आहेत. जुही परमार, आमिर अली, रिद्धिमा पंडित, जन्नत जुबेर, किश्वर मर्चंटपासून मौनी रॉय अशा अनेक कलाकारांनी या जोडप्याचे अभिनंदन करत आहे.

# सलमान सोसाइटीचा टीजर प्रेक्षकांच्या भेटीला!

मनोरंजन विश्वात सध्या मराठी चित्रपटांची चांगलिच चर्चा आहे. आता त्यातच 'सलमान सोसायटी' हा मराठी चित्रपट गेल्या काही दिवसांपासून चर्चेत आला आहे. नुकतच या चित्रपटातील पहिलं गाणं प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. 'पार्टी दणाणली...' असे या गाण्याचे बोल होते. या गाण्याला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. आता या चित्रपटाचा टीजर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. 'सलमान सोसायटी' हा चित्रपट शिक्षणावर भाष्य करतो. भारत देश साक्षर होईल तेव्हा भारताचा विकास होईल या आशयाचा हा सिनेमा आहे. चित्रपटाचा टीजर पाहिल्यानंतर चित्रपटाच्या कथेची कल्पना येते. एका लहानग्याला शाळेची ओढ या चित्रपटात दाखवली आहे. अनाथ मुलाची शिक्षण घेण्यासाठीची धडपड आणि त्यासाठी त्याने आणि त्याच्या सोबतच्या मित्रांनी लावलेली शक्कल या चित्रपटाच्या टिझरमध्ये दाखवण्यात आली आहे. या चित्रपटात गौरव मोरे एका वेगळ्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. तसेच पुष्कर लोणारकर, शुभम मोरे आणि विनायक पोतदार हे बाल कलाकार या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. 'सलमान सोसायटी' चित्रपटाचे दिग्दर्शन कैलाश पवार व निर्मिती रेखा सुरेंद्र जगताप , शांताराम खंडू भोंडवे व वैशाली सुरेश चव्हाण प्राजक्ता एण्टरप्राईजेसच्या बॅनर अंतर्गत करण्यात आली आहे.

# शिल्पाचा बिझनेस माइंड



बॉलीवूडमधील सर्वात सक्सेसफुल अभिनेत्रींपैकी एक शिल्पा शेट्टी कुंद्रा आता एक यशस्वी बिझनेसवुमन म्हणून स्वत:ला प्रस्थापित करण्यात व्यस्त आहे. यासाठी तिने आपली व्यावसायिक जाण खूप चांगली विकसित केली आहे. शिल्पा शेट्टी कुंद्रा 2 कोटींच्या गुंतवणुकीतून 15 कोटींहून अधिक कमावणार आहे. MAMAEARTH चा IPO येताच त्याच्या खिशात 15 कोटींहून अधिक रक्कम येईल. MAMAEARTH च्या मूळ कंपनीचे नाव HONASA CONSUMER आहे. MAMAEARTH च्या IPO चा प्राइस बँड 308 ते 324 रुपये प्रति इक्विटी शेअर घोषित करण्यात आला आहे. या पब्लिक इश्यूमधून गुंतवणूकदार पैसे कमावतील की नाही, हे शेअर्सच्या लिस्टनंतरच कळेल. IPO 31 ऑक्टोबर 2023 रोजी प्राथमिक बाजारात दाखल होईल. विशेष बाब म्हणजे बॉलीवूडची फिटेस्ट अभिनेत्री शिल्पा शेट्टी कुंद्रा आणि IPO च्या इतर प्रवर्तकांना 365 कोटी रुपयांच्या या IPO मधून अंदाजे 15.65 कोटी रुपये मिळतील. त्यामुळे, MAMAEARTH IPO कितीही लिस्ट केले तरी बी-टाउन अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या बँक खात्यात 15.65 कोटी रुपये येतील. MAMAEARTH IPO च्या ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस किंवा DRHP नुसार, शिल्पा शेट्टी कुंद्राचे नाव त्या प्रवर्तकांमध्ये आहे ज्यांनी MAMAEARTH च्या मूळ कंपनी HONASA CONSUMER LIMITED मधील त्यांचे स्टेक विकण्याची ऑफर दिली आहे.

# इमरान - जिनिलीया 15 वर्षांनी पुन्हा एकत्र!





२००८ साली आलेला जाने तु या जाने ना सिनेमा सर्वांना आठवत असेलच. या सिनेमाचं स्वतःचं एक वेगळं फॅन फॉलोईंग आहे. आजही हा सिनेमा पाहणारे असंख्य चाहते आहेत. अभिनेत्री जिनिलीया देशमुख आणि इमरान खान हे १५ वर्षांनी एकत्र आलेत. या दोघांना पाहुन चाहत्यांना जाने तु या जाने जा सिनेमाची आठवण आलीय. इमरान खान आणि जिनीलिया डिसूझा यांचा एक फोटो सोशल मीडियावर व्हायरल झालाय. त्यांच्या भेटीचा हा फोटो पाहून त्यांच्या चाहत्यांना मात्र आनंद झालाय. लीना अरान्हा नावाच्या एका इंस्टाग्राम यूजरने हा फोटो शेअर केला आहे. तिने याला कॅप्शन दिले, "या दोघांना भेटून नेहमीच आनंद होतो." या फोटोवर इमराननं कमेंट केलीय. या दोघांना १५ वर्षांनी एकत्र पाहुन सर्वांना जाने तु या जाने ना सिनेमाची आठवण आली इमरान खान जाने तू... या जाने ना, दिल्ली बेल्ली, लक, मेरे ब्रदर की दुल्हन, आय हेट लव स्टोरीज आणि एक मैं और एक तू अशा चित्रपटांसाठी ओळखला जातो. 2015 मध्ये तो कंगना रणौतसोबत कट्टी बट्टीमध्ये इमरान शेवटचा दिसला होता. तीन वर्षांनंतर, त्याने 'मिशन मार्स: कीप वॉकिंग इंडी' हा लघुपट दिग्दर्शित केला, जो त्याचा शेवटचा मुख्य प्रवाहातील सिनेमाचा प्रयत्न ठरला. त्यानंतर इमरान इंडस्ट्रीतुन गायब झाला. पण त्याचे चाहते त्याच्या कमबॅकची आतुरतेने वाट पाहत आहेत. जिनिलीया डिसूझाच्या वर्क फ्रंटबद्दल सांगायचं झालं तर २०२३ च्या सुरुवातीलाच वेड सिनेमाच्या माध्यमातुन जिनिलीयाने संपुर्ण महाराष्ट्राच्या मनामनात राज्य केलं. याशिवाय जिनिलीया लवकरच आमिर खानच्या 'सितारे जमीन पर' मध्ये झळकणार आहे.

# लंडन विद्यापीठाकडून ट्विंकलचा गौरव!



बॉलिवूड अभिनेत्री ट्विंकल खन्ना ही नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. ती आता जरी मोठ्या पडद्यापासून दूर असली तरी सोशल मिडियावर तिची चर्चा रंगतेच. कधी काळी मोठा पडदा गाजवणारी ट्विंकल ही आता वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. काही दिवसांपुर्वी ट्विंकलने ती मास्टर्स करायला लंडनला गेल्याचे एका पोस्टमधून चाहत्यांना सांगितले होते. आता नुकतच ट्विंकलने तिचा मित्र आणि चित्रपट निर्माता करण जोहरबद्दल असं काही वक्तव्य केलं की ज्याची सर्वत्र चर्चा रंगली आहे. ट्विंकलने सोशल मिडियावर एक पोस्ट शेयर केली आहे ज्यात तिने लंडन विद्यापीठातून पदव्युत्तर पदवी पूर्ण केल्याबद्दल आणि कवानाघ पुरस्कार प्राप्त केल्याची माहिती चाहत्यांना दिली आहे. या पोस्टच्या कॅप्शनमध्ये ट्विंकलने लिहिले की, "एक मोठा क्षण, आणि सुरुवातीला मला ते सर्वांना सांगायला थोडी लाज वाटत होती. पण हा क्षण दाखवतो की वय ही खरोखर फक्त एक संख्या आहे.

जी तुमची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तुमच्या मार्गात कधीच अडथळा आणत नाही. मला माझ्या फायनल प्रबंधासाठी पदवी मिळाली आहे. आता लंडन विद्यापीठाच्या गोल्डस्मिथ्सने पॅट कावनाघ पुरस्कारासाठी निवडले आहे. यानिमित्ताने मी सांगू इच्छितो की, कदाचित माझ्या जुन्या मित्राने 'स्टुडंट ऑफ द इयर'मध्ये चुकीच्या कलाकारांना कास्ट केले असावं. या पोस्टमध्ये तिने एक पत्रही शेअर केले आहे, ज्यात असे म्हटले आहे की तिचा पोर्टफोलिओ पॅट कवानाघ पुरस्कारासाठी निवडला गेला आहे, जो गोल्डस्मिथ्सच्या एमए इन क्रिएटिव्ह आणि लाइफ रायटिंग प्रोग्राममधील सर्वोत्कृष्ट कामासाठी दरवर्षी दिला जातो. आता ट्विंकलची ही पोस्ट सोशल मिडियावर व्हायरल झाली आहे. अनेक कलाकारांनी तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

तर ट्विंकल खन्नाचा पती अभिनेता अक्षय कुमारने देखील

# मला अजिबात पश्चाताप नाही!

## निवृत्तीनंतर भारतात परतताच अश्विनचं जंगी स्वागत

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाचा अनुभवी फिरकी गोलंदाज आर अश्विन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर आता भारतात परतला आहे. चेन्नईला पोहोचल्यावर अश्विनचे जंगी स्वागत करण्यात आले. अश्विनच्या आई-वडिलांनी त्याचं जोरदार स्वागत केलं, यादरम्यान त्याचे आई-वडिल भावुक झालेले दिसले. अश्विनने चेन्नई विमानतळावर रिपोर्ट्सच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार दिला होता, पण नंतर त्याच्या राहत्या घरी पोहोचल्यावर त्याने वक्तव्य केलं आहे.**



भारतीय संघाचा अनुभवी फिरकी गोलंदाज आर अश्विन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर आता भारतात परतला आहे. चेन्नईला पोहोचल्यावर अश्विनचे जंगी स्वागत करण्यात आले. अश्विनच्या आई-वडिलांनी त्याचं जोरदार स्वागत केलं, यादरम्यान त्याचे आई-वडिल भावुक झालेले दिसले. अश्विनने

चेन्नई विमानतळावर रिपोर्ट्सच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार दिला होता, पण नंतर त्याच्या राहत्या घरी पोहोचल्यावर त्याने वक्तव्य केलं आहे.भारतीय संघाचा अनुभवी फिरकी गोलंदाज आर अश्विन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर आता भारतात परतला आहे. चेन्नईला पोहोचल्यावर अश्विनचे जंगी स्वागत करण्यात आले. अश्विनच्या आई-वडिलांनी त्याचं जोरदार स्वागत केलं, यादरम्यान त्याचे आई-वडिल भावुक झालेले दिसले. अश्विनने

चेन्नई विमानतळावर रिपोर्ट्सच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार दिला होता, पण नंतर त्याच्या राहत्या घरी पोहोचल्यावर त्याने वक्तव्य केलं आहे.भारतीय संघाचा अनुभवी फिरकी गोलंदाज आर अश्विन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर आता भारतात परतला आहे. चेन्नईला पोहोचल्यावर अश्विनचे जंगी स्वागत करण्यात आले. अश्विनच्या आई-वडिलांनी त्याचं जोरदार स्वागत केलं, यादरम्यान त्याचे आई-वडिल भावुक झालेले दिसले. अश्विनने

चेन्नई विमानतळावर रिपोर्ट्सच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार दिला होता, पण नंतर त्याच्या राहत्या घरी पोहोचल्यावर त्याने वक्तव्य केलं आहे.भारतीय संघाचा अनुभवी फिरकी गोलंदाज आर अश्विन आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर आता भारतात परतला आहे. चेन्नईला पोहोचल्यावर अश्विनचे जंगी स्वागत करण्यात आले. अश्विनच्या आई-वडिलांनी त्याचं जोरदार स्वागत केलं, यादरम्यान त्याचे आई-वडिल भावुक झालेले दिसले. अश्विनने

### गाजत त्याच्या राहत्या घरी स्वागत

चेन्नई विमानतळावर त्याच्या स्वागतासाठी गर्दी होती, याचबरोबर विमानतळावर त्याची पत्नी आणि दोन मुलीही पोहोचल्या होत्या. ज्याचा व्हीडिओ पाहायला मिळत आहे. यानंतर अश्विनच्या चेन्नईमधील घराजवळ चाहत्यांनी आणि मित्रपरिवाराने त्याच्या स्वागतासाठी गर्दी केली होती.ब्रिस्बेनमधील सामना संपल्यानंतरच अश्विन भारतासाठी रवाना झाला. यानंतर प्रदीर्घ प्रवासानंतर तो गुरुवार १९ डिसेंबरला सकाळी चेन्नई विमानतळावर उतरला. त्याची पत्नी आणि मुली त्याला घेण्यासाठी आल्या होत्या. अश्विन विमानतळाबाहेर येताच मीडियाची गर्दी पाहायला मिळाली. यानंतर अश्विन काळ्या रंगाच्या व्हॉल्वोमध्ये बसून घराकडे निघाला.अश्विनच्या स्वागतासाठी त्याच्या घरी विशेष तयारी करण्यात आली होती. सोसायटीतील लोक, आई-वडील, मित्रपरिवार आधीच वाट पाहत होते. अश्विनला हार घालत, वाजत गाजत त्याच्या राहत्या घरी त्याचं स्वागत करण्यात आलं. अश्विन गाडीतून बाहेर येताच त्याचे वडील घराबाहेर आले.

चेन्नई विमानतळावर रिपोर्ट्सच्या प्रश्नांची उत्तरे देण्यास नकार दिला होता, पण नंतर त्याच्या राहत्या घरी पोहोचल्यावर त्याने वक्तव्य केलं आहे.बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमधील गाबा कसोटी अनिर्णित राहिली आणि टीम इंडियाचे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत जाण्याची शक्यताही कायम राहिली. पण यादरम्यान भारताचा दिग्गज फिरकीपटू रवीचंद्रन अश्विनने सामन्यानंतर अचानक निवृत्ती जाहीर करत सर्वांनाच धक्का दिला. पत्रकार परिषदेत अधिकृत घोषणेदरम्यान, त्यांनी सांगितले होते की भारतीय क्रिकेटपटू म्हणून हा त्याचा अखेरचा दिवस आहे आणि तो आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर करत आहे. यानंतर लगेच दुसऱ्या दिवशी म्हणजे आज तो मायदेशात परतला आहे. अश्विन आता मायदेशात पोहोचला असून चेन्नई विमानतळावरील त्याचा व्हीडिओ व्हायरल होत आहे.

---

# हेड मेलबर्न कसोटीत खेळणार नाही?

## बॉर्डर गावस्कर ट्रॉफीत हेडने केल्या आहेत सर्वाधिक धावा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**ऑस्ट्रेलियाचा फलंदाज ट्रॅव्हिस हेड बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये भारतीय गोलंदाजांसाठी डोकेदुखी ठरला आहे. आतापर्यंतच्या तिन्ही कसोटी सामन्यांमध्ये त्याने उत्कृष्ट कामगिरी करत ऑस्ट्रेलियाकडून बॉर्डर गावस्कर ट्रॉफी २०२४-२५ मध्ये सर्वाधिक धावा करणारा खेळाडू आहे. मात्र, हा खेळाडू पुढील कसोटी सामन्यात खेळणार की नाही हे अद्याप निश्चित नाही.**




गाबा कसोटी सामन्याच्या पाचव्या दिवशी त्याला दुखापत झाली, त्यानंतर त्याच्या खेळण्याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.गाबा कसोटीच्या पाचव्या दिवशी हेड फलंदाजीसाठी आला तेव्हा तो अडचणीत असल्याचे स्पष्टपणे दिसत होते. हेड मांडीच्या दुखापतीने त्रस्त आहे. पहिल्या डावात शतक झळकावणाऱ्या हेडला दुसऱ्या डावात केवळ १७ धावा करता आल्या. विकेटच्या दरम्यान धावा करतानाही तो अडचणीत दिसला. भारताच्या दुसऱ्या डावात तो क्षेत्ररक्षणासाठीही आला नाही. गाबा कसोटीच्या यजमान संघाच्या पहिल्या डावात त्याने शतक झळकावत १५६ धावांची दमदार खेळी केली. या खेळीसाठी त्याला सामनावीराचा पुरस्कारही मिळाला. पुरस्कार मिळाल्यानंतर बोलताना त्याने आपल्या दुखापतीवरही अपडेट दिले आहेत. हेड म्हणाला, मी माझ्या फलंदाजीवर खूप आनंदी आहे. थोडी सूज आहे पण पुढच्या सामन्यापर्यंत ठीक होईल. विकेट आव्हानात्मक होती. मला धावांसाठी खूप मेहनत करावी लागली. स्टीव्ह स्मिथबरोबरची भागीदारी चांगली ठरली.

### गाबा कसोटीत त्याला दुखापत

मी परिस्थितीशी झटपट जुळवून घेण्यावर लक्ष केंद्रित केलं. स्मिथ देखील फॉर्ममध्ये परतला होता, त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला कारण मला आता माहित होतं आता तो मोठी खेळी करणार.पावसाने व्यत्यय आणलेली भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसरी कसोटी बुधवारी अनिर्णित राहिली आणि मालिका १-१ अशी बरोबरीत आहे. खराब प्रकाश आणि पावसामुळे खेळ थांबला, तेव्हा भारताने विजयासाठी २७५ धावांच्या लक्ष्याला प्रत्युत्तर देताना बिनबाद ८ धावा केल्या होत्या.